# आदर्श उपविधी
# ( पोटनियम )

# जिल्हा सहकारी मंडळ

# आदर्श उपविधी ( पोटनियम )

१. **संस्थेचे नांव व पत्ता** :- ------------------------------------------------------------

**संस्थेचे नांव**:- -----------------------------------------------------

**पत्ता** ------------------------------------------------------------------------------------------------------------------ असा आहे.

पत्त्यात बदल झालेपासून ३० दिवसांचे आत तो बदल महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३७ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ३१ मधील तरतुदीनुसार निबंधकांना कळविला जाईल. नियमानुसार उपविधीत दुरुस्ती केल्याशिवाय तो बदल नोंदला गेला असे समजण्यात येणार नाही.

**नोंदणी क्रमांक** --------------------, **नोंदणी** दिनांक- -------------------------------------

२. **कार्यक्षेत्र**

बोर्डाचे कार्यक्षेत्र ---------------------------- जिल्ह्यापुरते मर्यादित राहील परंतु या कार्यक्षेत्रात समान उद्देशाची दुसरी संस्था नोंदली गेल्यास त्या संस्थेच्या कार्यक्षेत्रात समाविष्ठ असलेला भाग या बोर्डाचे कार्यक्षेत्रातून आपोआप वगळण्यात आले असल्याचे समजण्यात येईल.

3. **व्याख्या :**

१) **बोर्ड** - बोर्ड म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ९ अन्वये नोंदणीकृत झालेली जिल्हास्तरावरील असलेली --------------- जिल्हा सहकारी बोर्ड मर्यादित,------------ ही संस्था

२) **संघ** - संघ म्हणजे महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या, पुणे

३) **विभागीय सहकारी मंडळ** - विभागीय सहकारी मंडळ म्हणजे या जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेले ---------------------------------------------- विभागीय सहकारी मंडळ मर्या.

४) **संस्था** - संस्था म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ व १० अन्वये नोंदलेली अगर नोंद केली म्हणून समजण्यात आलेली सहकारी संस्था.

५) **अधिनियम** - अधिनियम म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०

६) **नियम** - नियम म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१

७) **उपविधी** - उपविधी म्हणजे -------------------------- जिल्हा सहकारी बोर्ड मर्यादित ------------------------------चे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १३ व १४ अन्वये नोंदणीकृत उपविधी

८) **शासन** म्हणजे महाराष्ट्र शासन

९) **संचालक मंडळ** - संचालक मंडळ म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अन्वये बोर्डाच्या कारभाराची व्यवस्था पाहणेसाठी उपविधी क्र ९ प्रमाणे गठीत झालेले संचालक मंडळ

१०) **निबंधक** - निबंधक म्हणजे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३ अन्वये नेमलेली व्यक्ती

११) **पदाधिकारी** - पदाधिकारी म्हणजे उपविधी क्र.९ अनुसार निवडून आलेले बोर्डाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष

१२) विशेष कार्याधिकारी वर्ग-२ / जिल्हा सहकार विकास अधिकारी, जिल्हा सहकार विकास अधिकारी म्हणजे प्रशासकीय कामकाज पार पाडणेसाठी जबाबदार असलेला अधिकारी व ते संचालक समितीचे कार्यलक्षी संचालक असतील मात्र संचालक मंडळ सभेत त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही

१३) सभासद- सभासद म्हणजे संस्थेच्या नोंदणीसाठी करण्यात आलेल्या अर्जात सहभागी होणारी संस्था अथवा नोंदणीनंतर ज्याने सभासदत्व स्विकारले आहे अशी संस्था

१४) सहकार वर्ष - म्हणजे १ एप्रिल ते ३१ मार्च रोजी संपणारे वर्ष

१५) सेवक- म्हणजे बोर्डाचे काम पारपाडण्यासाठी नेमलेली पगारी व्यक्ती

१६) क्रियाशिल सभासद- क्रियाशिल सभासद म्हणजे जी संस्था सभासद बोर्डाच्या कारभारात भाग घेते किंवा यापुढील उपविधीमध्ये नमुद केले प्रमाणे बोर्डाच्या सेवांचा किंवा साधनांचा वापर करते अशी संस्था

## ४. उद्देश

१) महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या, विभागीय सहकारी मंडळाच्या व सहकार खाते यांच्या मार्गदर्शनाखाली बोर्ड ही जिल्ह्यातील सहकारी शिक्षण-प्राशिक्षण देणारी शैक्षणिक संस्था म्हणून पुढील प्रमाणे कार्य हाती घेईल

२) बोर्ड सहकारी चळवळीच्या पोषक वाढीसाठी व सहकारी संस्था कार्यक्षम बनविण्यासाठी आवश्यक ते कार्य हाती घेईल व त्यासाठी निधी उभारील

३) सहकारी संस्थांचे सभासद, पदाधिकारी,कार्यकर्ते, अधिकारी, कर्मचारी व सेवक यांना सहकारी चळवळीबाबत शिक्षण-प्रशिक्षण देणे, कार्यशाळा घेणे तसेच सहकार खात्यातील अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण वर्ग वा कार्यशाळा घेणे

४) सहकारी शिक्षण व प्रशिक्षण बदलत्या काळानुसार सक्षम करण्यासाठी अधुनिक तंत्रज्ञानात व साधनांनी सहकारी चळवळीची वाढ करणे

५) सहकारी चळवळीची सर्वांगिण प्रगती साधण्यासाठी बोर्डाचे कार्यक्षेत्रात नवीन प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन करण्यास सहकार्य करणे/प्रोत्साहन देणे

६) सहकारी चळवळीची अद्यावत माहितीची नियतकालीके , पत्रके, विशेषांक, सांख्यीकीय माहिती, सहकार दैनंदिनी, सहकारी संस्थांचे पोटनियम, शासनाच्या सहकारी कायद्यात वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार कायदयाची पुस्तके तयार करुन प्रकाशीत करणे सहकारासंबधी वाङमय प्रसिध्द करणे, प्रकाशित करणे

७) वेळोवेळी सहकारी कार्यकर्ता मेळावे, परिसंवाद, परिषदा, कार्यशाळा भरविणे व त्याबाबतचा अहवाल संघाकडे पाठविणे

८) सहकारी संस्थांच्या क्रियाशिल सभासदांचा अभ्यासदौरा आयोजीत करुन चांगल्या आदर्श सहकारी संस्थांना भेटी देऊन सभासदांना प्रोत्साहित करणे

९) महिला सहकारी संस्था अगर औद्योगिक सहकारी संस्थांनी उत्पादित केलेल्या मालाची विक्री व ,प्रसिध्दी व्हावी म्हणून प्रदर्शन भरवून माल विक्रीस प्रोत्साहन देणे

सहकार खाते व संघ यांचे सहकार्याने जिल्हास्तरावर, तालुकास्तरावर व ग्राम पातळीवर मेळावे घेणे व समस्यांची माहिती संकलित करुन योग्य त्या विभागाकडे पाठविणे व पाठपुरावा करणे

## ५. निधी

बोर्ड खालील स्त्रोतामार्फत संस्थेच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी निधी उभारेल व सदर निधीचा विनियोग करण्याचा अधिकार बोर्डाच्या संचालकसमितीस राहील. विनियोग करुन शिल्लक राहिलेल्या निधीची गुंतवणूक आवश्यकते प्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम - ७० प्रमाणे करेल

१) सभासद अर्ज विक्री व प्रवेश फी

२) व्यक्ती , कंपनी, भागिदारी संस्था व सहकारी संस्थांकडून देणग्या / अनुदान

३) सभासद वार्षिक वर्गणी

४) वित्तीय संस्थांकडील कर्जे.

५) स्थावर मालमत्तेतून मिळणारे उत्पन्न

६)	शासकीय अनुदान

७)	लेखन सामुग्री, पुस्तके, फॉर्मस् वगैरेच्या विक्रीवर मिळणारे कमिशन, अनुदान रुपाने मिळणाऱ्या रकमांचा विनियोग करण्याचा अधिकार बोर्डास राहिल

८)	शिक्षण - प्रशिक्षण कार्यक्रम शुल्क आकारुन मिळणारे उत्पन्न

९)	संघ अनुदान

## ६.	सभासदत्व

जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्था बोर्डाच्या सभासद राहतील बोर्डाचे सभासदत्व मिळणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २२ (१) प्रमाणे पात्रता असेल.

१)	बोर्डाचे सभासदत्वासाठी बोर्डाने निर्धारीत केलेला विहीत नमुन्यातील अर्ज केला पाहिजे व त्यासोबत रु. १००/- प्रवेश फी दिली असली पाहिजे

२)	सभासदत्वासाठी दाखल केलेल्या अर्जावर अर्ज करणाऱ्या संस्थेच्या संचालक समितीचे अध्यक्ष व दोन सदस्य यांच्या सह्या असल्या पाहिजेत. व अर्जावर सह्या करण्याचा अधिकार दिलेला आहे, असा ठराव असला पाहिजे.

३)	उपविधी क्र.७ अन्वये निर्धारीत केलेली सभासद वर्गणी सभासद अर्जासोबत दिली पाहिजे तसेच सभासदत्व मिळाले नंतर सदर वर्गणी दरवर्षी सहकारी आर्थिक वर्ष संपलेनंतर सहा महिण्याचे आंत भरली पाहिजे.

## ७. सभासद वर्गणी

बोर्डाच्या सभासदांना खालील प्रमाणे वार्षीक वर्गणी आर्थिक वर्ष संपलेनंतर ६ महिन्यांचे आंत भरावी लागेल.

| अ. नं. | संस्था प्रकार | वार्षिक वर्गणी रुपये |
|---|---|---|
| १. | कृषि सहकारी संस्था | १०० |
| २. | उपसा जलसिंचन सहकारी संस्था | २०० |
| ३. | पिक संरक्षण सहकारी संस्था | २०० |
| ४. | ग्राहक सहकारी संस्था | २५० |
| ५. | सहकारी बँका | १००० |
| ६. | गृहनिर्माण सहकारी संस्था | १०० |
| ७. | प्रक्रिया सहकारी संस्था | ३०० |
| ८. | उत्पादक सहकारी संस्था | ३०० |
| ९. | साधन संपत्ती सहकारी संस्था | ३०० |
| १०. | सर्वसाधारण सहकारी संस्था | ५०० |
| ११. | कंपनी / भागीदारी / धर्मदाय इ. संस्था | १००० |
| १२. | स्थानिक प्राधिकारी संस्था | १००० |

सभासदाने उपरोक्त नमुद वर्गणी भरल्याशिवाय त्यास सभासदत्वाचे हक्कांचा वापर करता येणार नाही. तसेच वर्गणी थकबाकीदार सभासदास संस्थेच्या कामकाजात मतदानाचा अधिकार असणार नाही.

**८. संस्था सभासदत्व रद्द होणे -**

१) खालील कारणांमुळे संस्था सभासदत्व आपोआप रद्द होईल.
२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २५ मधील तरतुदी अन्वये.
३) अशा व्यक्तीवर नैतिक अध:पतनाबाबतचा फौजदारी गुन्हा सिध्द झाला असेल.
४) जर सभासदाने राजीनामा दिला असेल व त्याचा राजीनामा स्विकारला गेला असेल तर सभासदत्व रद्द होईल. मात्र त्यापुर्वी त्यांच्याकडून येणे असलेली सभासद वर्गणी बोर्डाकडे जमा केली जाईल.
५) कोणत्याही संस्था सभासदाने बोर्डाचे संचालक समितीच्या मते बोर्डास अपकिर्ती आणली असेल तर, किंवा कामकाज सुरळीत चालविण्यास व बोर्डाच्या हितास बाधा येईल असे कोणतेही कृत्य केले असेल तर, अगर बोर्डाची प्रतिष्ठा ज्यायोगे कमी होईल अशी कोणतीही गोष्ट हेतू पुरस्सर केली असेल तर अशा संस्था सभासदास अधिनियमाच्या तरतुदीनुसार संचालक समितीचे ठरावाने सर्व साधारण सभेच्या शिफारशी नुसार त्याचे सभासदत्व रद्द करण्यात येईल. परंतु त्यापुर्वी त्या संस्था सभासदास सर्व साधारण सभेसमोर आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल

बोर्डाचे सभासद असलेल्या संस्थेचे समाप्तीकरण झाले असल्यास

**९. संचालक समिती-**

बोर्डाची संचालक समिती खालील प्रमाणे राहील

**९ अ) निवडून आलेले प्रतिनिधी**

| अ. नं. | संस्था प्रकार | प्रतिनिधी संख्या |
|---|---|---|
| १. | प्रत्येक तालुक्याला एक प्रतिनिधी | १३ |
| २. | पुणे शहर १, २, ३, ४, ५, ६ विभागा मधून ३ प्रतिनिधी * | ३ |
| ३. | अनुसुचित जाती / जमाती प्रतिनिधी | १ |
| ४. | विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागासप्रवर्ग प्रतिनिधी | १ |
| ५. | इतर मागास वर्ग प्रतिनिधी | १ |
| ६. | महिला प्रतिनिधी | २ |
| | एकूण :- | २१ |

* (राखीव जागेव्यतिरिक्त इतर प्रतिनिधींच्या संख्या प्रत्येक जिल्हा सहकारी बोर्डाने निश्चीत करावी.)

**९. ब) या व्यतिरिक्त खालील प्रमाणे ४ स्विकृत संचालक राहतील**

| | | |
|---|---|---|
| १. | तज्ञ संचालक | २ |
| २. | कार्यलक्षी संचालक ( फंक्शनल डायरेक्टर ) * | २ |

*(संचालक समिती सदस्यांची संख्या १७ असल्यास एक आणी १७ पेक्षा अधीक असल्यास दोन कार्यलक्षी संचालक स्वीकृत करता येतील.)

**९-१** उपविधी क्र.९अ (१) प्रमाणे १३ प्रतिनिधींची निवड ही त्या -त्या तालुक्यातील बोर्डाचे सर्व क्रियाशिल सभासद संस्था त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधी मार्फत केली जाईल

**९-२** उपविधी क्र.९ अ (२) प्रमाणे ३ प्रतिनिधींची निवड ही पुणे शहर १,२, ३, ४, ५ व ६ मधील बोर्डाचे सर्व क्रियाशिल सभासद संस्था त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधी मार्फत केली जाईल

**९-३** अनुसुचित जाती - जमाती / विमुक्त जाती- भटक्या जमाती- विशेष मागास प्रवर्ग / व इतर मागास वर्ग / व महिला प्रतिनिधींची निवड बोर्डाचे सर्व क्रियाशिल सभासद संस्था त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीमार्फत केली जाईल

**९.४** दोन तज्ञ संचालकांची स्विकृती संचालक समिती निवडून आल्यानंतर होणा-या पहिल्या संचालक समिती सभेत करण्यात येईल व त्यांचा कालावधी संचालक समितीच्या मुदती एवढा राहील त्यांना बोर्डाचे कोणत्याही निवडणूकीस उभे राहण्याचा / निवडणूकीसाठी मतदान करण्याचा अधिकार असणार नाही तसेच त्यांना बोर्डाचे पदाधिकारी होता येणार नाही

**९.५** दोन कार्यलक्षी संचालकांची (फंक्शनल डायरेक्टर ) स्विकृत संचालक समिती निवडूण आले नंतर होणा-या पहिल्या संचालक समितीत करण्यात येईल त्यापैकी बोर्डाचे विशेष कार्याधिकारी वर्ग-२ / जिल्हा सहकार विकास अधिकारी हे एक कार्यलक्षी संचालकास असणे अनिवार्य राहिल व त्याचा कालावधी संचालक समितीच्या मुदती एवढा राहील कार्यलक्षी संचालकास बोर्डाचे कोणतेही निवडणूकीस उभे राहण्याचा / निवडणूकीसाठी मतदान करण्याचा अधिकार असणार नाही तसेच संचालक समिती सभेत मतदानाचा अधिकार असणार नाही तसेच त्यांना बोर्डाचे पदाधिकारी होता येणार नाही.

**९.६** निवडणूकीने निवडून येण्यासाठी व निवडणूकीला मतदान करण्यासाठी या बोर्डाचे क्रियाशिल संस्था सभासदासच निवडणूकीला उभे राहण्याचा व मतदानाचा अधिकार राहील तथापी, संस्था सभासद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २७ अन्वये पात्र असला पाहिजे . तसेच महाराष्ट्र अधिनियम १९६० चे कलम २६ अन्वये पात्र असला पाहिजे

**९.७** वरील प्रमाणे तयार झालेली संचालक समिती निवडून आलेनंतर होणा-या पहिल्या संचालक समिती सभेत अध्यक्ष व उपाध्यक्ष या पदाधिका-यांची राज्य निवडणूक प्राधिकरणामार्फत निवड करतील त्यासाठी उपविधी क्र. ९ ब मधील तज्ञ व कार्यलक्षी संचालक मतदान करणार नाहीत सदर पदाधिका-यांची मुदत संचालक समिती मुदतीएवढी राहील

**९.८** बोर्डाच्या संचालक समितीची मुदत निवडणूकीच्या दिनांकापासून ५ वर्षाची राहिल

**९.९** बोर्डाचे संचालक समिती सदस्याने समितीच्या लागोपाठ तीन सभांना मा. संचालक समिती अध्यक्षांना पूर्व सुचना दिल्याशिवाय आणि योग्य त्या कारणाशिवाय अनुपस्थित राहिल्यास त्याचे पद आपोआप रिकामे झाले असे समजण्यात येईल राखीव जागावरील रिक्त झालेले संचालक पद हे त्याच प्रवर्गाच्या सभासदामधून भरणे आवश्यक राहील रिक्त झालेली पदे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीप्रमाणे भरली जातील

**९.१०** राजीनामा, मृत्यू किंवा कोणत्याही कारणाने रिक्त झालेले संचालक समिती सदस्याचे पद हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतूदीप्रमाणे भरण्यात येईल

**९.११** संचालक समितीची निवडणूक राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत होईल.

**१०-अ ) क्रियाशिल सभासद म्हणजे** -

१) संचालक समिती कालावधीचे सलग ५ वर्षात किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणारा सभासद आणि

२) संचालक समिती कालावधीचे सलग ५ वर्षात किमान एकदा बोर्डाकडून सदस्य संस्थेच्या समिती सभासद अथवा कर्मचारी यांनी प्रशिक्षण घेणे आवश्यक किंवा बोर्डाव्दारे घेण्यात येणारे परिसंवाद अथवा चर्चासत्र यांना सभासद संस्थेचा प्रतिनिधि हजर राहणे आवश्यक

**१०-ब) क्रियाशिल सभासद नोंदवही** -

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३८ अन्वये सभासदांची नोंदवही ठेवावी लागेल व ती आर्थिक वर्ष संपलेनंतर दर वर्षी अद्ययावत करावी लागेल. त्याचप्रमाणे खालील नोंदवहया दरवर्षी आर्थिक वर्ष संपलेनंतर अद्ययावत कराव्या लागतील

२. उपविधी तरतुद क्र. १० अ ची पुर्तता करणारे सभासदांचे नांव क्रियाशिल सभासद नोंदवहीत राहील

उपविधीची तरतुद क्र. १० अ ची पुर्तता न करणारे सभासदांचे नांव अक्रियाशील सभासद नोंदवहीत राहील

संस्थेने सभासदांचे अक्रियाशील सभासद असे वर्गीकरण केलेस त्यास आर्थिक वर्ष संपलेचे दिनांकापासून ३० दिवसात कळविले पाहिज़े तथापी क्रियाशिल व अक्रियाशील सभासदाचे वर्गीकरणाबाबत वाद उदभवल्यास असे वर्गीकरण केलेचे दिनांकापासून ६० दिवसांचे आत निबंधकाकडे अपिल करता येईल.

**१० क)** अक्रियाशील सभासदास संस्थेच्या कामकाजात मतदानाचा अधिकार राहणार नाही अक्रियाशील सभासद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६ प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

**११. तज्ञ संचालक अर्हता-**

सहकार विषयक संशोधन किंवा शिक्षण, प्राशिक्षण संबधी कामकाजाचा प्रदिर्घ अनुभव असलेले सहकारी चळवळीतील कार्यकर्ते किंवा शासकीय / निमशासकीय संस्था / सेवामधील आजी / माजी प्राचार्य / प्राध्यापक / वर्ग-१ / वर्ग -२ दर्जाचे अधिकारी व ज्याची निवड संचालक समितीने केली आहे असा होय.

**१२. कार्यलक्षी संचालक अर्हता (फंक्शनल संचालक)**

बोर्डाचा विशेष कार्याधिकारी वर्ग-२ / जिल्हा सहकार विकास अधिकारी किंवा सहकार शिक्षणाधिकारी किंवा बोर्डाचा अधिकारी ज्याची निवड संचालक समितीने केली आहे असा अधिकारी होय.

**१३. संचालक समिती सदस्यत्वासाठी अनर्हता -**

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ - ग क अन्वये अनर्हता धारण करणारा सभासद.

२) उपविधी क्र. १० (अ) अन्वये अनर्हता धारण करणारा सदस्य.

**१४. बोर्डाचे संचालक समितीची निवडणूक -**

बोर्डाचे संचालक समितीची निवडणूक महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे तरतूदी अन्वये घेतली जाईल.

**१५. संचालक समितीची कर्तव्ये, अधिकार आणि जबाबदा-या-**

१) बोर्डाच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल आणि हिशोबाची पत्रके तयार करणे, व ती वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे संचालक समितीची मान्यता व शिफार शीसह मंजूरीसाठी सादर करणे.

२) बोर्डाचे पुढील वर्षाचे अंदाजपत्रक तयार करून वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे संचालक समितीची मान्यता व शिफारशीसह मंजूरीसाठी सादर करणे.

३) उपविधी क्र. ५ प्रमाणे निधी उभारणे व आवश्यकतेप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार गुंतवणूक करणे.

४) राज्य संघाचे वतीने सहकारी चळवळीचा प्रवक्ता म्हणून सहकार चळवळीवर परिणाम करणा-या प्रश्ना संबधी सहकारी संस्थांची मते जाणून घेणे, निवेदन करणे आणि प्रचाराचे माध्यमातून जनमत तयार करणे.

५) उपविधी क्र. ४ मधिल उद्देशांची पुर्तता करण्यासाठी वार्षिक नियोजन आराखडा तयार करणे व त्यानुसार सहकारी शिक्षण, प्रशिक्षण, सहकारी परिषदा, परिसंवाद, परिचर्चा, कृतिसत्रे, कार्यशाळा, सभा संमेलने, अभ्यास दौरे आयोजित करणे, सहकारी प्रदर्शने भरविणे, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर या कार्यक्रमात सहभागी होणे.

६) बोर्डाचे सेवकांचे पगार भत्ते व सेवा नियम तयार करुन वार्षीक सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने अमलबजावणी करणे.

७) बोर्डाचे सभासदत्वासाठी आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

८) सहकारी संस्थांचे सभासद, भावी सभासद, सहकारी चळवळीतील कार्यकर्ते व सहकारी संस्थांचे आणि सहकार पणन, वस्त्रोद्योग, पदुम, सामाजिक न्याय, आदिवासी विकास विभागाचे सेवक यांना सहकार विषयक शिक्षण आणि प्रशिक्षण देण्यासाठी व्यवस्था करणे .

९) सभासद संस्थांच्या गरजेनुसार शिक्षण व प्रशिक्षणाचे कार्यक्रम घेणे.

१०) बोर्डाची सर्वसाधारण सभा बोलाविणे.

११) उपविधी क्र. ७ प्रमाणे वर्गणी, देणग्या व अनुदान मिळविणे.

१२) शैक्षणिक कार्यक्रम राबविणेसाठी जागा मिळविणे, खरेदी करणे, इमारत बांधणे, निगा ठेवणे.

१३) बोर्ड ज्या संस्थांचे सभासद आहे त्या संस्थांचे वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी प्रतिनिधी पाठविणे.

१४) सहकार व तत्संबधी विषयावरील पुस्तकांची खरेदी विक्री करणे.

१५) आवश्यकते नुसार बोर्डाचे पोटनियम दुरुस्ती बाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणे.

१६) बोर्डाचे आर्थिक हित लक्षात घेवून बोर्डाची मालमत्ता भाडयाने देणे, तसेच आवश्यकतेनुसार स्थावर मालमत्ता भाडयाने घेणे.

१७) बोर्डाचे आर्थिक हित लक्षात घेवून बोर्डासाठी स्थावर व जंगम मालमत्ता मालकी हक्काने निर्माण करणे, धारण करणे.

१८) सहकारी तत्त्वे व कार्यप्रणाली लोकप्रिय करणे.

१९) बोर्डाचे वतीने किंवा बोर्डाचे विरूध्द न्यायालयात दाखल दाव्यांची तडजोड करण्यासाठी, निराकरणासाठी किंवा चालविण्यासाठी कायदेतज्ञाची नेमणूक करणे, सदर दावा दाखल करण्याचा व चालविण्याचा अधिकार बोर्डाच्या पदाधिका-यास / अधिका-यास देणे व त्याचे व्यावसायीक शुल्क / मेहनताना ठरविणे.

२०) संचालक समिती बोर्डासाठी एका शिक्क्याची ( मोहोर ) तजविज करील, असा शिक्का (मोहर ) तयार करण्याचा अधिकार संचालक समितीस असेल, संचालक समितीने त्यासंबधी ठराव पारीत केल्यानुसार ज्याची याबाबत खास करुन नेमणूक केली आहे, अशा संचालक समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांना हा शिक्का सर्व प्रकारच्या लेखी करारावर व दस्तऐवजावर उठविता येईल आणि संचालक समितीचे हे सदस्य बोर्डाचा शिक्का ज्या प्रत्येक दस्तऐवजावर त्यांच्या उपस्थितीत उठविला आहे, अशा दस्तऐवजावर स्वाक्षरी करतील.

२१) बोर्डाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांनी किंवा संचालक समिती सदस्याने दिलेला राजीनामा स्विकारल्याची नोंद घेणे. तसेच बोर्डाचे सेवकांचे राजीनामे स्विकृत करणे.

२२) संचालक समितीने सभेतील विषयावर निर्णय घेणे बधंनकारक राहील. एखाद्या विषयावर निर्णय घेण्याचे अधिकार पदाधिका-यांना देवू नये.

२३) बोर्डाचे सेवकांचे हितासाठी सेवक कल्याण निधी उभारणे त्यास आर्थिक मदत करणे.

२५) बोर्डाचे वैधानिक लेखापरिक्षण कलम ८१ अन्वये विहीत मुदतीत होणेसाठी ताळेबंद, जमाखर्च पत्रके, इतर आर्थिक दस्तऐवज तयार करणे व बोर्डाचे वैधानिक लेखापरिक्षकांचे नेमणूकीसाठी लेखापरीक्षकांचे नाव वार्षीक सर्वसाधारण सभेस संचालक समितीची मान्यता व शिफारशीसह मंजूरीसाठी सादर करणे व वार्षिक सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेले लेखापरिक्षकाचे नांव त्याचे संमतीसह वार्षीक सर्वसाधरण सभेचे दिनांकापासून ३० दिवसाचे आत निबंधकास कळविणे.

२६) बोर्डाचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल व दोषदुरूस्ती अहवाल वार्षीक सर्वसाधारण सभेस आणि निबंधकास संचालक समितीची मान्यता व त्यावर केलेल्या कार्यवाहीसह, शिफारशीसह मंजूरीसाठी सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा कलम ८२ (६) मधील तरतुदीनुसार संचालक मंडळ कारवाईस पात्र राहील.

२७) बोर्डाचे संचालक समितीचा कालावधी संपण्याचा दिनांक राज्य सहकारी निवडणूक प्राधिका-यास मुदत संपण्याच्या दिनांकापूर्वी सहा महिने अगोदर कळविणे व संचालक मंडळ मुदत संपणेपुर्वी निवडणुक घेणेबाबत

निबंधक व राज्य सहकारी निवडणूक प्राधिका-यास कळविणे व निवडणूक खर्चाची तरतुद करून तो त्यापोटी सक्षम प्राधिका-यास वर्ग करणे. संचालक समिती सदस्यत्व आणि पदाधिकारी पद रिक्त झाल्यास रिक्त दिनांकापासून १५ दिवसांचे आत राज्य सहकारी निवडणूक प्राधिका-यास कळविणे आणि निवडणूकी संबधाने राज्य सहकारी निवडणूक प्राधिका-याने मागविलेली पुस्तके, अभिलेख, माहिती पुरविणे तसेच निवडणूकीसाठी मतदार यादी तयार करणेस्तव आवश्यक ती मदत, सहाय्य व सहकार्य करणे.

२८) (अ) बोर्डाचे संचालक समिती सदस्याने उपविधी क्रमांक ९.९ अन्वये असलेल्या विहीत मुदतीत किमान दोनदा ठरवून दिलेले एक दिवसीय सहकार शिक्षण / प्रशिक्षण घेतले पाहीजे.

(ब) संचालक समिती कालावधीचे सलग ५ वर्षात किमान एकदा सभासद व सेवक यांना प्राशिक्षण देणे अनिवार्य राहील.

(क) संचालक / सेवक व सभासद यांचे शिक्षण प्रशिक्षणासाठी शिक्षण प्रशिक्षण निधीची विहीत करण्यात येईल. अशा दराने दरवर्षी अनुदानाची तरतुद करणे अनिवार्य राहील.

२९) सभासदास संस्थेचे दप्तर आणि आर्थिक बाबींचे अभिलेख पाहावयास उपलब्ध करणे.

३०) आर्थिक वर्ष संपल्यावर सहा महिन्यात निबंधकाकडे खालील विवरण पत्रे सादर करणेची व्यवस्था करणे.

१) संस्थेच्या कार्याचा वार्षिक अहवाल

२) लेखापरीक्षीत आर्थिक पत्रके व जमाखर्च पत्रके

३) नफा वाटणी ( असल्यास ) व वार्षिक सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेले अतिरिक्त निधीचे विल्हेवाट लावणेचे नियोजन

४) उपविधी दुरूस्ती ( असल्यास )

५) वार्षीक सभेची तारीख / निवडणूक असलेस समितीची मुदत संपणेची तारीख व नविन समिती निवडून येणेची अंतिम तारीख

६) लेखापरिक्षक नेमणूक आदेश त्यांचे संमतीसह वार्षीक सर्वसाधारण सभेचे दिनांकापासून ३० दिवसाचे आत कळविणे

७) निबंधकाने कायदयातील तरतुदीस अनुसरून विचारलेली इतर माहिती

३१) उपविधी क्र. १५ (३१) अन्वये विवरणपत्रे मुदतीत सादर न केल्यास दर दिवाशी रू. १००/-प्रमाणे दंड कसूर करणाराकडून निबंधकाचे आदेशाने वसुल केला जाईल

**१६.** संचालक समितीची सभा किमान ३ महिन्यातून एकदा होईल संचालक समिती सदस्य संख्येच्या २/३ इतके सदस्य उपस्थित असले म्हणजे संचालक समिती सभेची गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल, गणपूर्तीचे गणनेत तज्ञ संचालक आणि कार्यरत संचालक यांचा समावेश असणार नाही संचालक समिती सभेची सूचना संचालक मंडळ सदस्याने कार्यालयास दिलेल्या पत्त्यावर रजिस्टर ए. डी. पोस्टाने / स्पीड पोस्टाने / कुरियरने / साध्या पोस्टाने पूर्ण दहा दिवस अगोदर पाठविण्यात येईल.

## १७. सर्वसाधारण सभा

१) बोर्डाची वार्षिक सर्वसाधारण सभा दरवर्षी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ मध्ये विहीत केल्याप्रमाणे ३० सप्टेंबर पर्यंत घेण्यात येईल.

२) बोर्डाच्या सभासद असलेल्या सहकारी संस्थांना त्यांचे संचालक मंडळ ठरावाद्वारे नियुक्त केलेल्या प्रतिनिधीना वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्याचा अधिकार असेल व त्यामध्ये क्रियाशिल सभासदानांच प्रत्येकी एक मत असेल.

३) एकापेक्षा अधिक संस्थांचे प्रतिनिधीत्व करणा-या व्यक्तीस तो जितक्या संस्थांचे प्रतिनिधीत्व करीत असेल तेवढीच मते देता येतील.

४) साधारण सभेची सुचना सभासदांना पूर्ण १४ दिवसांची देण्यात येईल, या सुचनेत तारीख, वेळ, स्पष्ट पत्ता व सभेमध्ये चर्चेला येणारे विषय नमूद केलेले असतील, सभेची सुचना बोर्डाच्या अध्यक्षांच्या लेखी सुचनेनुसार बोर्डाचे विशेष कार्याधिकारी वर्ग-२ / जिल्हा सहकार विकास अधिकारी यांचे सहीने काढण्यात येईल. उपविधी नियम क्र. १७ (१) अन्वये मुदतीत वार्षीक सर्वसाधारण सभा घेण्याची जबाबदारी मा. अध्यक्ष व विशेष कार्याधिकारी वर्ग -२ / जिल्हा सहकार विकास अधिकारी यांची राहील.

५) वार्षिक साधारण सभेसाठी सभासद संख्येच्या १/५ किंवा १०० यापैकी जी संख्या कमी असेल तेवढी गणपूर्ती राहील. सभेची गणपूर्ती न झाल्यास सभेच्या सुचना पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे ती सभा त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर घेतली जाईल किंवा ७ दिवसांपेक्षा कमी नाही अशा नंतरच्या कालावधीपर्यंत तहकुब केली जाईल आणि अशा तहकुब सभेमध्ये मूळ संस्थेच्या विषय पत्रिकेवरील विषयाप्रमाणे कामकाज होईल अशा सभेस गणपूर्तीची आवयकता राहणार नाही.

६) वार्षिक साधारण सभा, संचालक मंडळ सभा, या सभांचे सभा वृत्तांत सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांच्या नावांसह त्याच कारणासाठी ठेवण्यात आलेल्या स्वतंत्र रजिस्टरमध्ये सभेच्या अध्यक्षांच्या सहीने नोंदण्यात येतील. वार्षिक साधारण सभेचा इतिवृतांत संचालक समिती सभेपुढे कार्यवाहीसाठी ठेवण्यात येईल आणि तो पुढील वार्षिक साधारणसभेत कायम करण्यात येईल.

७) वार्षिक साधारण सभा, संचालक मंडळ सभा, या सभेपुढील सर्व विषयांवर उपस्थित व मतदान करणेस पात्र असणा-या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात येतील. तथापी, समान मते पडल्यास सभेच्या अध्यक्षांना एक निर्णायक मत असेल मात्र पदाधिकारी निवडणुकीचे संदर्भात समान मत प्रसंगी चिठ्ठया टाकुन निर्णय घेण्यात येईल.

८) बोर्डाच्या वार्षिक साधारण सभेच्या कामकाजात खालील विषयांचा समावेश असेल.

१) संचालक समितीकडून सादर झालेल्या वार्षिक कामकाजाचा अहवाल

२) लेखापरीक्षीत ताळेबंद, उत्पन्न खर्च पत्रक व मागील लगतच्या आर्थिक वर्षीचा लेखापरिक्षण अहवाल सादर करणे

३) पुढील वर्षाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.

४) आवश्यकतेनुसार बोर्ड उपविधी आणि सर्व साधारण सभेने मंजूरी दिलेले बोर्डाचे नियम यातील सुधारणांवर विचार करणे व निर्णय घेणे व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करणे.

५) शिल्लक रकमेच्या विनीयोगासाठीची योजना

६) मागील लगतचे आर्थिक वर्षापूर्वीच्या वर्षाचा लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवाल

७) चालू आर्थिक वर्षासाठी शासन मान्यताप्राप्त पॅनेलवरील लेखा परिक्षकांची वैधानिक लेखापरिक्षणासाठी नियुक्ती करणे व त्याचे मानधन / लेखापरिक्षण शुल्क ठरवणे.

८) पुढील सर्वसाधारण सभेची तारीख ठरविणे

९) सभासदांचे हकालपटटी बाबत सभेपुढे आलेल्या विषयावर निर्णय घेणे

१०) बोर्डाचे संचालक समितीचा कालावधी संपण्याचा दिनांक व निवडणूक प्रक्रीया सुरू करण्याचा दिनांक निबंधकास कळविणे व निवडणूक खर्चाची तरतूद करणे

११) अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमाच्या तरतुदीनुसार, नियमानुसार निबंधकाने मागवलेली इतर कोणतीही माहिती

१२) शासन अथवा इतर कोणत्याही संस्थेशी भागीदारी करार करणेबाबत निर्णय घेणे

१३) मत्ता व दायित्व एकत्रीकरण, विभाजन, हस्तांतरण याबाबत निबंधक / शासन यांचे पुर्वसंमतीने निर्णय घेणे

१४) रितसर विषय ठेवून सभेचे सुचनापत्र निर्गमित केले आहे असे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व बोर्डाचे मंजुर उपविधीतील तरतुदीचे अनुषंगाने पार पाडावयाचे इतर कामकाज.

९) वार्षिक साधारण सभेचे सुचना पत्र व वार्षिक अहवाल सदस्यांच्या नोंदलेल्या पत्त्यावर पोस्टाने पाठविली जाईल. केवळ कोणत्याही सदस्यास सुचनापत्र व वार्षिक अहवाल मिळाला नाही याच कारणासाठी साधारण सभा बेकायदोशीर ठरू शकणार नाही.

१०) वार्षिक साधारण सभेस अथवा त्या कारणासाठी खास बोलाविलेल्या साधारण सभेस उपस्थित असलेल्या आणि मतदान करणा-या सदस्यांच्या २/३ बहुमताने ठरल्याशिवाय मंजूर उपविधीतील कोणताही उपविधी बदलता येणार नाही, रद्द करता येणार नाही अथवा त्यात भर घालता येणार नाही. तसेच निबंधकाने मान्य केल्याशिवाय आणि नोंदविल्याशिवाय उपविधीतील सुधारणा अमलात येणार नाही.

बोर्डाचे वार्षिक साधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी सभासदांना / प्रतिनिधींना/ संचालक मंडळ सदस्यांना / पदाधिका-यांना बोर्डाकडुन प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

**१८. विशेष साधारण सभा**

विशेष साधारण सभा म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७६ अन्वये बोलावलेली सभा. सदर सभा पूर्ण चौदा दिवसांची सुचना देवून संस्थेचे अध्यक्ष किंवा विशेष कार्याधिकारी वर्ग-२ / जिल्हा सहकार विकास अधिकारी यांना बोलावता येईल अशी सभा बोलविण्याची जबाबदारी संस्थेचे अध्यक्ष किंवा विशेष कार्याधिकारी वर्ग-२ / जिल्हा सहकार विकास अधिकारी यांची राहील.

**१९.** बोर्डाचे अध्यक्ष, त्यांचे अनुपस्थितीत बोर्डाचे उपाध्यक्ष, वार्षिक साधारण सभा, विशेष साधारण सभा, संचालक समिती सभांचे अध्यक्ष राहतील या दोघांच्या अनुपस्थितीत सभेस उपस्थित सदस्यांमधुन सभेकरीता अध्यक्षांची निवड करेल.

**२०. अध्यक्षांचे अधिकार, कर्तव्ये व जबाबदा-या**

१) बोर्डाचे मा. अध्यक्ष हे बोर्डाचे कार्यकारी प्रमुख असतील.

२) बोर्डाची वार्षिक सर्वसाधारण सभा व संचालक समिती सभेचे अध्यक्ष या नात्याने काम करणे, सभांमधून झालेल्या ठरावांची अंमलबजावणी होते की नाही हे पाहणे व ती करवून घेणे.

३) बोर्डाचे सर्व प्रकारच्या सभांच्या तारखा निश्‍चित करणे .

४) संस्थेच्या दैनंदिन व्यवहारावर देखरेख व नियंत्रण ठेवणे, मार्गदर्शन करणे, संचालक मंडळाच्या निर्णयाची अंमलबजावणी संस्थेच्या हिताच्या दृष्टीने करणे, संचालक मंडळाने/ सर्वसाधारण सभेने ठरविलेल्या धोरणांची अंमलबजावणी करणे.

५) सर्व साधारण सभेत मतदानाची मागणी झाल्यास त्यावर निर्णय घेणे.

६) सभेतील विषयांवर चर्चेअंती निर्णय देणे.

७) बोर्डाचे उद्दिष्ट पुर्तीसाठी कार्यप्रवण राहणे.

८) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ व कलम ७९ अन्वयेची विवरणपत्रे सादर करणे.

**२१. उपाध्यक्षांचे अधिकार, कर्तव्ये व जबाबदा-या**

अध्यक्षांचे अनुपस्थितीत त्यांनी दिलेल्या अधिकारानुसार कामे करणे.

**२२.** पदाधिकारी यांची वरील कर्तव्ये असून ती कर्तव्ये पार पाडण्यास त्यांनी कसूर केली असे संचालक मंडळ सदस्यांना वाटल्यास त्यांनी त्यांचे विरूध्द अविश्वासाचा ठराव आणल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

**२३. विशेष कार्यकारी वर्ग-२ /जिल्हा सहकारी विकास अधिकारी यांचे अधिकार, कर्तव्ये व जबाबदा-या**

१) बोर्डाच्या संचालक समिती व सर्वसाधारण सभेचे अनुषंगाने सर्व कामे करणे. तसेच या सभांनी केलेल्या ठरावांची अमलबजावणी करणे.

२) बोर्डाची वार्षिक साधारण सभा व संचालक समिती सभा अभिलेख जतन करणे, सभा सुचना, विषय सुची, विषयवार टिपणी, इतिवृतांत सादर करणे, इतिवृत नोंदवही अद्ययावत करणे.

३) बोर्डाचे दैनंदिन प्रशासकिय कामकाजावर देखरेख करणे, नियंत्रण ठेवणे व मार्गदर्शन करणे

४) बोर्डाचे सर्व स्तरावरील सेवकांचे जॉब चार्ट करणे व त्याप्रमाणे कामकाजावर नियंत्रण ठेवणे.

५) सेवकांचे आस्थापना विषयक कामकाज

६) बोर्डाचे लेखा विषयक कामकाज

७) शिक्षण, प्रशिक्षण, प्रचार, प्रसिध्दी व संशोधन विषयक कामकाजाचे संचालक समितीने ठरविलेले धोरण राबविणे.

८) निधी संकलनासंबधी आवश्यक तो सर्व पत्रव्यवहार संस्था व निबंधक यांचेशी करणे.

९) नियतकालिके, प्रकाशने, पुस्तके खरेदी विक्रीची कामे करणे.

१०) राज्य सहकारी संघ, विभागीय सहकारी मंडळ व निबंधक यांनी शिक्षण-प्रशिक्षण याबाबत सोपविलेल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे.

११) संचालक समितीचे ठरावाप्रमाणे न्यायालयीन दावे व इतर कायदेशीर कामकाजावर देखरेख ठेवणे.

१२) मा. अध्यक्षांनी वेळोवेळी सोपविलेली कायदा व नियमास अनुसरून इतर कामे करणे.

१३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ व कलम ७९ अन्वयेची विवरणपत्रे सादर करणे.

**२४.** संस्थेचे आर्थिक वर्ष १ एप्रिल रोजी सुरू होईल व येणा-या ३१ मार्च रोजी संपेल.

**२५.** संस्थेचे कार्य व कामकाज, तिचे उपविधी, अधिनियम व नियम तसेच राज्यशासन किंवा मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे हे वेळोवेळी काढतील अशा धोरण विषयक निर्देशानुसार चालेल.

**२६. तक्रार निवारण समिती -**

बोर्ड दरवर्षी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संचालक नसलेल्या तीन क्रियाशिल सभासदांची गा-हाणे, समझोता व निवारण समिती सभासदांमधील / संचालक व संस्थेमधील वाद / गा-हाणे सोडविणेसाठी प्रस्तावित करेल अशा समितीमध्ये बोर्डाचे ज्येष्ठ सभासद व बोर्डाच्या कामाचा अनुभव असणा-या व्यक्ती असतील व गठीत समितीचा अहवाल निबंधकास कळविल. त्यावर समितीचा अहवाल वेळोवेळी संचालक मंडळ सभेत मांडण्यात येईल संचालक मंडळाने मान्यता दिले नंतर तो मान्य होईल. सदर गा-हाणे समझोता व निवारण समितीची कार्यपध्दती, अधिकार व अभिलेख तरतुद कलम ८९ (अ ब) प्रमाणे असेल.

**टिप : उपरोक्त नमूद उपविधीतील कोणतीही तरतुद भारतीय संविधान सहकारी संस्थांचा कायदा व नियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्यास ती लागू होणार नाही**

-o-*-*-*-o-